# विवेक विचार

**एस.डी. कोंडोलीकर**
स्वा.से.श्री.क.रा. इन्नाणी महाविद्यालय कारंजा (लाड) जि. वाशिम
dkondolikar@gmail.com

## सारांश

*“माणूस घडविणे हे माझे जिवीत कार्य आहे : विवेकानंद”*

*विमनस्क आणि हतबल झालेले राष्ट्रजीव हे प्रामुख्याने त्यांच्या सामाजिक स्तरावरील अधोगतीचा परिपाक असते असे प्रतिपादन करता करता स्वामीजींनी समाजोन्नतीच्या सुधारणांचा मार्ग सुर्यप्रकाशा इतक्या स्वच्छ पद्धतीने आपल्या समोर ठेवला, अध्यात्म, कर्मयोग, धर्मजीवन, ऐहिक विकास, समताधिष्ठित रचना आदी विषयावर एका विचारसूत्राच्या आधारे प्रकट झालेले स्वामीजींचे भाष्य म्हणजे जणू काही सारी जळमटे आणि मलभ दूर करणारा गुरु शिष्यांचा किंवा दोन मित्रांचा संवाद असावा असे आत्मीयतेचा अनुभव देणारे पाथेयच होय. राष्ट्रनिर्माणाच्या आधाराशी समाजजीवनाचाच विचार असतो. सुखी, संपन्न, आत्मनिर्भर समाजच प्रगतीच्या दिशा आक्रमिल्यास समर्थ होऊ शकतो. म्हणूनच अशा समर्थ समाजाच्या सुस्थापनेसाठी स्वामी विवेकानंदांच्या सामाजिक विचारांचे स्मरण अत्यावश्यक ठरते. भावविश्वाला भिडणारे समाजचिंतन या सर्व विचारांमध्ये आढळते. अर्थकारण, संपत्तीचे समान वाटप, शोषणमुक्त समाजाची निर्मिती, समताधिष्ठीत व्यवहारासाठी लागणारे सामंजस्य, स्त्रीजीवनाचा सर्वांगीण विचार, पाश्चात्यांच्या भोगवादी विचारावर मात करण्याची क्षमता असणारा सनातन धर्म विचार या आणि अशाच अनेक अंगांनी हे सामाजिक विचारांचे अमोल धन आपल्याला प्राप्त होते.*

*आजच्या युवा पिढीला ह्या विचारांचे सतत मार्गदर्शन व लाभ मिळाला तर नवी पिढी नव्या विचारांनी व नव राष्ट्र निर्मीतीस नक्कीच हातभार लागेल. स्वामी विवेकानंदाच्या १५० व्या जयंती दिन वर्षा निमित्य त्यांच्या विचारांचा घेतलेला हा धावता आढावा. स्वामी विवेकानंदाच्या पावन स्मृती विनम्र अभिवादन.*

## प्रस्तावना

भारत हा धर्मप्रधान देश आहे. धर्माच्या आध्यात्मिक शक्तिमुळेच हा देश विश्वाच्या मानचित्रावर विश्वगुरुच्या उपाधीने सुशोभित असून शक्तिसंपन्न व शांती प्रिय देश म्हणून मान्यता प्राप्त होता. याचे श्रेय कोणा राजनेत्यास जात नाही, तर हे संत महापुरुषांचे अथक परिश्रमाचे फळ होय. संत, महापुरुषांनी ज्ञान, ध्यान, योग, नीति, आदर्श, मर्यादा, चरित्र या उच्चतम सत्‌शिक्षणाद्वारे मानव समाजाचा पाया मजबूत करुन “जगा आणि जगू द्या” “सर्वे भवन्तु सुखिनः” या भावनेचा व्यापक प्रचार केला. त्यांनी समाजाचे विभाजन केले नाही, तर विभाजित झालेल्या समाजास आत्मज्ञानरुपी प्रणव सुत्रात समाविष्ट करुन एकता, समता व बंधुत्वता हा आदर्श स्थापित केला. कारण खरे संत महापुरुषच संपूर्ण मानव जातीचे हितचिंतक असतात.

पाश्चात्य व पौर्वात्य राष्ट्रांत भारताच्या संस्कृतीचा व विश्वबंधुत्वाची शिकवण देणारा, हिंदू धर्माची ध्वजा फडकविणारा आध्यात्मिक नेता म्हणून जगभर विवेकानंदाचे नाव घेतले जाते. भारतात त्यांनी आपल्या वक्तृत्वाने भारताचे भवितव्य घडविणाऱ्या युवा पिढीतील अनेक नेत्यांना प्रेरणा दिली. त्यांच्या साहित्यात तेज आहे, ओज आहे. त्यांनी सर्व भारतभर प्रवास केला. लोकांचे दैन्य पाहिले, अस्मिता गमावलेली भुकीकंगाल जनता पाहिली आणि या समाजात जागृतीची ज्योत पेटविली.

त्यांचे १८९३ च्या जागतिक धर्मपरिषदेतील भारतीय प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण, वैदिक वाङमयातील, उपनिषदातील तत्वज्ञान व विश्वबंधुत्ववादी धर्म यांचे सांगोपांग विवेचन करणारे भाषण साऱ्याच धर्मवेत्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे ठरले.

विवेकानंद अवतारवादाच्या अगदी विरुध्द होते. ते विज्ञाननिष्ठ होते. वैज्ञानिक विकास, विचार आणि दृष्टीचा उदय आपल्या देशबांधवा- मध्ये व्हावा यासाठी त्यांनी अथक, अपार परिश्रम उपसले आहेत.

विवेकानंदांच्या काळातील हिंदूधर्म हा वैदिक धर्म नसून पौराणिक धर्म आहे असे निक्षून सांगतांना वेदकाळात स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने स्थान होते हे पटवून देतांना दिसतात. त्यामुळे पौराणिक धर्मापासून सावध राहण्याचा इशाराही ते देतात. विवेकानंदांनी आपल्या भाषणातून, खाजगी गप्पांमधून लेख व पत्रांमधून हिंदू धर्मातील ढोंगबाजीवर कडाडून कोरडे हाणले आहेत. तसेच मानवधर्माच्या प्रचारासाठी ते अखेरपर्यंत झिजले आहेत.

धर्म म्हणजे बाळकडू, बस! असे स्वामीजी म्हणत, त्यासाठी ते उदाहरण देत की, ''जेव्हा आपण कोवळे रोप कुंडीत लावतो तेव्हा त्याची निगा राखतो. त्या रोपट्याचे जेव्हा वृक्षात रुपांतर होते तेव्हा कुंडी फुटून जाते, आपोआप नाहिशी होते. त्याच प्रमाणे इमारत जेंव्हा बांधून पूर्ण झाली की, बांबूचे मचाण काढून टाकले जाते तद्वतच वय वाढले, परिपक्वता आली की, परंपरागत धर्माचे अस्तित्व संपायला हवे.''

रामकृष्ण परमहंस व विवेकानंद ही गुरुशिष्याची जोडी सर्वांना आपलीशी वाटणारी जिव्हाळ्याची माणसं ठरली. कारण ती मानवतेवर प्रेम करणारी होती. रामकृष्ण परमहंस कारुण्यमूर्ती तर शिष्य विवेकानंद आक्रमक वृत्तीचे. धर्माच्या नावाखाली अंधविश्वासांना पूजनाचा रुढी प्रिय भक्तांवर आणि त्यांचे गुरुपद पटकावलेल्या ढोंगी बाबा, महाराज, भगवान व अवतारांवर त्यांनी कठोर शब्दव्रज उगारले आहे.

ह्या शिष्य द्वयांनी जाती प्रथेलाही विरोध केला आहे आणि जाती भेदविरुध्द स्फोटक शब्दोच्चारण करतांना आचरणातूनही ती किती निरर्थक आहे हे दाखवून दिले आहे. जाती प्रथा मनुष्य निर्मित असून तिचा ईश्वराशी सुतराम संबंध नाही हे त्यांनी कळवळून सांगितले आहे. धार्मिक तंटे उत्पन्न होऊ नयेत यासाठी हिंदूनी आधी जातीभेदाचं निर्मूलन करायला हवं आणि उच्च निच या गंडांतरापासून मुक्त व्हाव. माणूसकीवरील ते मोठे गंडात्तरच आहे. तो फार मोठा कलंक आहे. पतित, अधम वा दुर्बल म्हणून त्यांनी कुणाचाही उपहास केला नाही. अस्पृश्यते-वरही त्यांचा अजिबात विश्वास नव्हता.

दृढ विश्वास ही फार शक्तीशाली प्रेरणा आहे. ह्या दृढ विश्वासावर माणूस फार मोठे कार्य साध्य करु शकतो. दृढ विश्वासाचे महत्व पटवून देतांना ते तेवढ्याच दृढ निश्चयाने सांगतात, काहीही अस्तित्वात नसतं अशावेळी निराश न होता चांगल्या भविष्याची निर्मिती आपल्या कार्यातून होऊ शकेल असा दृढ विश्वास असेल तरच कार्याला उत्साहाने प्रारंभ करता येईल. दृढ विश्वास हाच महान कार्याचा जनक आहे असेही ते म्हणतात.

शैक्षणिक दृष्ट्या भारत संपन्न व्हावा म्हणून कुशाग्रबुध्दिमत्तेच्या विवेकानंदांनी शैक्षणिक विचार आयुष्यभर पेरले. ते एक द्रष्टे समाजवेत्ते होते हे त्यांनी या देशात निर्माण केलेल्या विचार क्रांतीतून स्पष्ट केले. भारतासारख्या कृषी प्रधान देशात ग्रामीण भागात बहुसंख्य शेतीवर जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल त्यांनी सतत पाठपुरावा केला. या मुलांना लिहायला, वाचायला शिकविण्याची नितांत गरज त्यांनी व्यक्त केली. समूहाला, अज्ञानांना ज्ञान देण्यावाचून वंचित ठेवू नये. ज्ञान हाच एकमेव मार्ग आहे जो मानव विकास साध्य करतो.

भारतात दारिद्रय पसरले आहे. त्यामूळे गरीबांची मुले शाळेत जावू शकत नाही अशावेळी शिक्षणानेच त्यांच्या पर्यंत पोहचले पाहिजे. विज्ञान व वेदत्त यांना एकत्र आणून त्यातून नवप्रणालीचा स्विकार व्हावा असे ते म्हणत. विवेकानंद आपले शिक्षण विषय विचार प्रतिपादन करतांना म्हणतात, ''आपल्या आधुनिक शिक्षण पध्दतीत ज्या इंद्रियांच्या साह्याने म्हणजे मनाच्या साह्याने, आपण ज्ञान प्राप्त करतो त्याचा विकास व्हावा यासाठी पुरेशी काळजी व प्रयत्न केले

जात नाहीत, तर एखाद्या झाडाने पाणी शोषून घ्यावे त्याप्रकारे मनाचा ज्ञान शोषून घेण्याकरिता उपयोग केल्या जातो.'' ज्ञान हे मनाचे भरण-पोषण करणारे असावे व ते प्रत्येकाला मिळाले पाहिजे.

प्राचीन शिक्षण पध्दती बद्दल आस्था असणाऱ्या विवेकानंदांनी आधुनिक मूल्याधारित शिक्षणावर भर दिला होता. आधुनिक विचार सरणीवर आधारित शिक्षण व्यवस्था ही सर्व तळागाळा पर्यंत पोहचली तरच भारत खरा विकसित होऊ शकतो ह्यावर त्यांचा ठाम विश्वास होता. या देशातील समाज व्यवस्थेतील शेतकरी, चांभार, भंगी, मांग व इतर तत्सम जाती या समाजातील प्रत्येकांकडे आवश्यक ती कार्य उर्जा आहे. त्यांची आत्मनिष्ठा प्रबळ असून या समाजाच्या तळापर्यंत विज्ञानाचा प्रादूर्भाव झाला पाहिजे म्हणजे त्यातून या समाजाचा ज्ञानात्मक चेहरा, समाजाचा गुणात्मक दर्जा कायम राहील. १८९५ साली लिहिलेल्या पत्रात स्वामी ब्रम्हानंदांना उद्देशून ते म्हणतात, ''दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, चांडाळाला शिक्षणाची जितकी गरज असते तितकी ब्राम्हणाला नसते, त्याला अधिक मदत करण्याची गरज आहे. गोरगरीब पद्दलित, अज्ञानी यांनाच तुम्ही आपला ईश्वर माना. त्यांना ब्राम्हणांपेक्षा अनेक पटीने अधिक शिक्षणाची आणि नोकरीची गरज आहे.''

जातीभेद, धर्मभेदाने या देशातील निम्मा समाजाला वर्षानुवर्षे गुलामीचे जीवन दिले त्यातून या समाजाला बाहेर काढण्यासाठी एक विशाल मन त्यांच्याजवळ होते. इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान साहित्य, कला हे विषय शिकविणे व या पददलित समाजाला ज्ञानी बनविणे काळाची गरज आहे असे विवेकानंदांना वाटते. या देशात अंधश्रध्दा, अज्ञान यातून बालविवाह विधवेचा प्रश्न या सारखे जटिल प्रश्न निर्माण केले आहेत. अस्पृश्यता ही समाजाचा घात करीत आहे. हे सर्व प्रश्न सामान्यांना शिकवण दिल्याशिवाय सुटणार नाहीत. म्हणून त्यांनी सर्व सामान्य माणसांना शिक्षणाच्या आवर्तात आणण्याचा प्रयत्न केला. ''ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायावर उभा राहू शकतो तेच खरे शिक्षण, उच्च शिक्षणाचा खरा उपयोग जीवनातील समस्या सोडविता येण्यात आहे.'' संपूर्ण दुःखाचे मुळ अज्ञानात दडले आहे हे म. फुलेंनी अग्रक्रमाने मांडले होते. विवेकानंदांनी देखिल अज्ञान दूर करण्याकरिता मातृभाषेचा अवलंब करा असा सल्ला दिला. त्यांचा भर नैतिक शिक्षणावर जास्त होता. असाच अभ्यासक्रम तयार करावा की, ज्याद्वारा सद्गुणांचा व बुध्दीचा पर्यायाने संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास साधता येईल.

विवेकानंदाचे स्त्री शिक्षण विचार अतिशय प्रगत होते. स्त्री समस्यांचा जटिल प्रश्न कायमचा सुटावा व स्त्रियांना समाजात सन्मान मिळावा म्हणून शैक्षणिक पात्रता त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे असे ते म्हणतात. ''शिक्षणाच्या जोरावर स्त्रीया स्वतः चांगले काय, वाईट काय हे समजू शकतील आणि वाईटांचा निश्चितच त्याग करतील.'' शिक्षणाचे प्रभावी अस्त्र त्यांच्या वर्षानुवर्षाच्या गुलामीला सुरंग लावल्याशिवाय राहणार नाही. हे स्पष्ट मत त्यांनी मांडले. भारतातील साऱ्या दुःख अनिष्ठाच्या मुळाशी जर कोणती गोष्ट असेल तर ती दरिद्री दलितांची अवस्था... ''आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने त्यांच्यात ज्ञानाग्नी प्रज्वलित करा.'' त्यासंदर्भात आरक्षणाचे धोरण विवेकानंदांनी सभा संमेलने व मठातील शिष्यांच्या संवादातून सर्व सामान्यांच्या विकासासाठी जाहिर केले.

त्यांचे स्त्रीयांच्या अधिकारासंबंधी विचार आधुनिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या मते भारतात स्त्रीला, मातेला ईश्वराचे स्थान दिले आहे परंतू वास्तविक मध्ये त्यांचा समाजात दर्जा हा अत्यंत खालचा दर्जा असतो. स्वामी विवेकानंदांच्या मते स्त्री ही स्वार्थशुन्यता, क्षमाशिलता, कष्ट सहिष्णुता भावयुक्त असते.

स्वामी विवेकानंदांच्या विचारानुसार स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात ज्ञानाची अधिकाराची समान भागीदारी आहे. स्त्रीयांप्रती त्यांचा मानवतेचा दृष्टीकोन होता. परमेश्वराने लिंगभेद केला नाही तर आपण का करायचा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचे परिमाण हे स्त्रियासोबत होणारे, समाजातील व्यवहार, स्त्रीयांची प्रगती तसेच अधिकाराची जपणूक यावरुन होते. स्त्रियांसाठी शिक्षण

हे अनिवार्य असणे गरजेचे आहे. शिक्षणामुळे समाजातील त्यांचे स्थान पुरुषांच्या समतोलाचे होईल. त्यामुळे समाजात सुधारणा होण्यास महिलांचा हातभार लागेल.

विवेकानंद हे स्वतः जरी क्रांतीकारक नसले तरी अनेक समकालीन क्रांतिकारकांना ते प्रेरक ठरले. याबद्दल दुमत नाही. मातृभूमीविषयी त्यांनी मांडलेल्या उद्दिपक विचारांमधून व राष्ट्रभक्ती, देशबांधवांचे शिक्षण, संघटन इ. विषयावर त्यांनी केलेल्या चिंतनामधून संपूर्ण देशातील प्रामुख्याने बंगालमधील तरुणांना देशकार्यासाठी आपले आयुष्य वेचण्यासाठी प्रेरणा मिळाली हे नाकारता येत नाही. विवेकानंदाच्या शिकवणुकीमुळे या राष्ट्राचे निद्रिस्त चैतन्य जागे झाले. त्यांच्या मृत्युनंतरच्या काळात बंगालात झालेले उठाव, अरविंद, टिळक, गांधी प्रभुतींचा धर्माधिष्ठित राष्ट्रवादी आणि त्यातून भारतीय जनतेने संघटितपणे उभे केलेले स्वातंत्र्य आंदोलन ही सारे विवेकानंदांनी केलेल्या बीजारोपणाची फलिते होत. वर्तमान जीवनात सर्वत्र आढळणारे भ्रष्ट, भ्रटाचार व भीतीमुक्त वातावरण, स्त्रीयांवरील अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जल समस्या या आणि यासारख्या अनेक समस्यांनी भारत होरपळलेला आहे. अशा परिस्थितीत ही पुन्हा एकदा विचार करण्याची गरज आहे. संस्कारांचे महत्व, नैतिकता, मानवता ह्याचा आदर्श हवा आहे. हिंदू संस्कृतीने, विवेकानंदांनी मांडलेले विचार महत्वाचे व काळाची गरज आहे.

राष्ट्रीय जीवनासाठी धर्माला दिलेले मध्यवर्ती स्थान ही या देशातील राजकिय विचाराला दिलेली महत्वाची देणगी होय. नवभारताची उभारणी ही धार्मिक-आध्यात्मिक अधिष्ठानावरच होऊ शकते असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी सांगितले होते की, भारताला जर जीवंत राहावयाचे असेल तर त्याने धर्मालाच आपल्या राष्ट्रीय जीवनाचा मूलाधार करावयास हवा. राजकारणा, सत्ता, बुध्दी यांना या देशात दुय्यम स्थान आहे. व्यक्तीप्रमाणेच राष्ट्राला एक जीवनध्येय असते. जर एखाद्या राष्ट्राने आपले ध्येय बाजूला सारण्याचा प्रयत्न केला तर त्या राष्ट्राचा मृत्यु ओढवेल. हे होवू नये असे वाटत असेल तर धर्म हाच त्यांच्या सर्व संवेदनांचा व भावनांचा आधार असला पाहिजे.

## संदर्भ

**स्वामी ब्रम्हस्थानंद (२०१०).** स्वामी विवेकानंद : उद्धृत, आदर्श शिक्षण, रामकृष्ण आश्रम, नागपूर

**अनामिक (१९९२).** स्वामी विवेकानंद, रामकृष्णमठ नागपूर प्रकाशन

**घोरमोडे, के. यु. (२००९).** शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र, नागपूर श्री विद्या प्रकाशन

**भोळे, भा.ल. (२००३).** आधुनिक भारतातील राजकीय विचार

**रोमाँ रोलाँ (१९६५).** दि लाईफ ऑफ विवेकानंद ॲड दि युनिव्हर्सल गॉस्पेल